
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. सं. ८५४.
९९३३

किंमत आठ आणे

कवि
मनमोहन



REFBK-0004947
REFBK-0004947

स्पृश्यास्पृश्य विवाहावर लिहिलेलें एक हृदयंगम खंड काव्य.

9e33

पुस्तक चवदावें

# उद्धार

मनमोहन

REFBK-0004947
REFBK-0004947

१९३३

## मनमोहन कृत पुस्तकें

# कॉलेजियन ( खंडकाव्य )

ही एक विश्वविद्यालयांतील अल्पजिवी पण मधुर आयुष्यांतील मनोविकारांचें प्रदर्शन करणारी एक प्रेम-कहाणी आहे. किमत ७ आणे

---

# सुनीत-गंगा

यांत पेट्रॉकीपद्धतीनं रचलेलीं निवडक सुनीतें एकत्रित केलीं आहेत. किंमत ४ आणे

---

# अफूच्या गोळ्या

विडंबन काव्यसंग्रह

किंमत ४ आणे

---

# कडूलिंब

विडंबन काव्यसंग्रह

किंमत ४ आणे

# —समर्पण—

अस्पृश्योद्धार करण्यासाठीं ज्यांनीं कायावाचामनें करून
प्रयत्न केले व जे करीत आहेत त्या, महात्मा गांधी, केळपा,
मालवीय, बिर्ला, आंबेडकर, देवधर, पुरंदरे, माटे, राज-
भोज, गाडगीळ कांनिटकर, जवळकर, राजगोपाळा-
चारिअर, जोशी, वरेरकर यांना व ज्यांनीं आपल्या
संस्थानापुरता अस्पृश्यांचा प्रश्न समाधान-
कारक सोडवून इतर संस्थानिकांना
उदाहरण घालून दिलें, त्या करवीर-
नृपति श्रीछत्रपति राजाराममहा-
राजांना आणि इचलकरंजीचे
चार्फ श्रीमंत बाबासाहेब
घोरपडे यांना ही अल्पकृति
अर्पण केली आहे.

—लेखक

# पूर्व इतिहास

हें काव्य लिहावयाला १९२६च्या मे महिन्यांत इंदूर मुक्कामीं सुरुवात केली; पण त्या वेळीं त्याचा 'सांगाडा' मात्र पूर्णपणें तयार झाला नव्हता आणि म्हणूनच कीं काय, तें वीसपंचवीस ओळींपलीकडे त्या वेळीं लिहून झालें नाहीं. पुढें १९२७–२८ या दोन वर्षांत एक ओळहि पुढें लिहून झाली नाहीं. यावरून तो काव्यविषय आम्हीं सोडून दिला होता असें नाहीं. त्या दोन वर्षांत काव्याचें संविधानक तयार करण्याकडे आम्हीं लक्ष पुरविलें. संविधानक तयार झाल्यावर समव्यवसायी मित्रांबरोबर त्याबाबत चर्चा केली. त्या वेळीं "हें असलें स्पृश्यअस्पृश्यांत रोटीबेटीव्यवहार व्हावा असें मत-प्रतिपादन करणारें काव्य बहुजनसमाजाला रुचणार नाहीं. तुम्ही उगीच त्या फंदांत पडूं नका." एतदर्थी सूचना त्यांच्याकडून आल्या; आणि त्या वेळच्या लोकमताची कल्पना केली असतां त्यांच्या सांगण्यांत कांहींच अर्थ नव्हता, असें म्हणतां आलें नसतें. 'स्वसमाधानासाठीं तरी लिहून काढावें, प्रसिद्ध करावयाचें किंवा नाहीं तें पुढें पाहूं.' अशा विचारानें लिहावयास सुरुवात केली.

इंदूरला सुरुवात केली, तेव्हां मालिनीवृत्ताची या खंडकाव्यासाठीं योजना केली होती. खंडकाव्याचा पसारा मोठा असतो. म्हणून व्यापारी बुद्धीनें बहुतेक कवी, ओंवी, साकी, उद्धव, आर्या यांसारखीं रचनेला सोपीं अशीं जातिवृत्तें उपयोगांत आणतात. तीं वृत्तें करावयाला जितकीं सोपीं तितकेंच त्यांचें सौंदर्य व नादमाधुर्य हीं आकुंचित. मालिनीवृत्त थोड्या अक्षरांचें म्हणून त्याऐवजीं दीर्घाक्षरी शार्दूलवृत्त वापरावयाचें ठरविण्यांत आलें. हें वृत्त वापरण्यांत ओळींच्या काटकसरीबरोबर तें सुनीताला योग्य हाहि दुसरा हेतु होताच.

त्या वेळीं सुनीत हा काव्यप्रकार मराठींत श्री. तांबे, Bee, चंद्रशेखर, माधव काटधरे इत्यादि कवींच्या प्रयत्नांनीं बराच लोकप्रिय झाला होता. खंडकाव्याला एकादा विशिष्ट काव्यप्रकार योजिला तर नाविन्याबरोबर सुंदरताहि प्रतीत होईल असें वाटलें आणि म्हणूनच सुनीत या काव्यप्रकाराचा अवलंब प्रस्तुत खंडकाव्यांत केला आहे.

काव्यविषय नवमतप्रतिपादक, वृत्त शार्दूलविक्रीडितासारखें मात्राजीवी आणि त्यांत एक विशिष्टभाव तन्मयतेनें लिहावा लागणारा, सुनीत हा काव्यप्रकार या तिन्ही गोष्टीं प्रथम आपत्तीशा वाटल्या; पण त्यांमुळें आज जें सौंदर्य प्रतीत झालेलें आढळून आलें, त्यावरून त्या आपत्ती नसून इष्टापत्तींच होत्या असें आज वाटतें.

१९३१ सालीं तामील कवी 'भारती'याच्या 'अस्पृश्य गीतशतका'चें पद्यमय भाषान्तर 'यंग इंडिया'मधून श्री. राजगोपालाचारिअर हे क्रमशः करीत होते. संख्येप्रमाणें गुणानेंहि तीं 'भारती'ची सत्कृति शंभर नंबरी होती. त्या गीतांचें मराठी भाषान्तर करण्याचा प्रयत्न आम्हीं केला. स्वतः 'भारती'चीं मतें सुधारकापेक्षां सुधारक शोभतील इतकीं पुढारलेलीं होतीं आणि तीं त्यांच्या काव्यांत त्यांनीं ठिकठिकाणीं रसभंग न होतां विखरून दिलीं होतीं. आपल्यापुढचें काव्य लोकांच्या कितपत पचनीं पडेल हें अजमावण्याकरितां तीं भाषांतरित गीतें त्या वेळचें राष्टीय पक्षाचें प्रमुख पत्र जें 'स्वराज्य' त्यामधून क्रमशः प्रसिद्ध केलीं. स्वराज्यपत्र वाचणाऱ्यांत जहालांबरोबर मवाळहि होते व त्याचप्रमाणें सुधारकांबरोबर सनातनीहि होते. हें त्या वेळीं आलेल्या खाजगी पत्रांतील मजकुरावरून समजून आलें.

कविमित्रांनीं 'रचना गोड', सुधारकांनीं 'विषय गोड' असें शाबासकीचें गुळखोबरें आमच्या पदरांत टाकलें. त्याबरोबरच अस्पृश्य हा जनावरासदृश आहे, त्याची सावली म्हणजे प्रत्यक्ष कृतान्ताची सावली, असें मानणाऱ्या सनातनी वाचकांनीं आम्ही भाषांतर करतों; म्हणून आम्हांला व संपादकबुवा तें छापतात म्हणून संपादकांना शिव्या द्यावयाला कमी केलें नाहीं. 'स्तुतीला तोंड आणि निंदेला पाठ' द्यावयाचा धडा त्या वेळीं आम्हांला तोंडपाठ झाला.

तें भाषांतराचें काम करीत असतांनाच हें काव्य लिहिणें हळुहळू चाललें होतें. महात्माजींनीं नुकत्याच केलेल्या अतुल प्राणान्तिक उपवासाच्या प्रतिज्ञेनें पुन्हा बुद्धीला चालना मिळाली; आणि त्या प्रासंगिक भावनेच्या आवेगांत हें काव्य पुरें झालें.

सुनीत हा काव्यप्रकार दोन तऱ्हांनीं विरचितां येतो. पहिल्या पद्धतीचें जनकत्व पेट्राक या इटालियन कवीकडे व दुसऱ्या प्रकाराचें जनकत्व आंग्लकवी शेक्सपीयरकडे दिलें जातें. पेट्राकची सुनीतरचनेची पद्धति अशी आहे

कीं, पहिल्या आठ ओळींत भावनेचें उद्दीपन करावयाचें व पुढच्या सहा ओळींत तिचें उपशमन करावयाचें. वरच्या आठ ओळींत तो अंत्य यमक साधावयाचा दुराग्रह करीत नाहीं; मात्र खालच्या सहा ओळींत तीं साधावींतच असा त्याचा कटाक्ष आहे. शेक्स्पीयरनें आपलीं सुनीतें याहून वेगळ्या तऱ्हेनें विरचिलेलीं आहेत; आणि तीच पद्धति प्रस्तुत काव्यांत अंगिकारलेली आहे. ती म्हणजे चारचार ओळींचीं तीन ' पदकें ' व शेवटचें दोन ओळीचें अर्धें ' पदक. ' हीच पद्धति अंगीकारण्याचें कारण संथभावना आविष्करणाला ही पद्धति जास्त सयुक्तिक वाटली हेंच होय.

बुद्धीला कुंठित करून सोडणाऱ्या एकाच प्रबल विचाराचें, भावनेला हलवून सोडणारें वर्णन करावयाचें असेल तर पेटाकपद्धति चांगली. विचाराचा आणि विकाराचा विस्तार करावयाचा असेल तर ती तितकीच निरुपयोगी. प्रस्तुत काव्यांत विकारवशतेचेंच प्राबल्य जास्त असल्यामुळें तिचा अंगीकार केला नाहीं.

सुनीत हें जसें एक लघुकाव्य आहे, तसेंच तें एक लघुवृत्तहि आहे. या काव्यांत लघुवृत्त या नात्यानेंच त्याचा उपयोग केला आहे. या पूर्वींच्या आमच्या ' कॉलेजियन ' खंडकाव्यांतहि आम्हीं हीच पद्धति अंगीकारली होती आणि वृत्तपत्रें व मासिकें यांमधून आलेल्या त्या काव्यावरील अभिप्रायांवरून रसिकांना तीं आवडलीं असेंच दिसून आलें.

प्रस्तुत काव्यांत कालिदासकृत ऋतुसंहारांमधील दोन कल्पना प्रसंगाला संयुक्तिक वाटल्या म्हणून घातल्या आहेत. ( जनताजनार्दन, सुरतसंग्राम, सुकांत चंद्रानना पातली इत्यादि. )

महात्माजींच्या परिश्रमानें झालेल्या ' पुणें करारा 'मुळें या काव्याचा शेवट गोड करावा लागला. काव्याचें कथानक पूर्णपणें काल्पनिक आहे. त्यांत वावरणाऱ्या व्यक्ती सत्यसृष्टींत आढळल्या तर त्यांत काकतालीय न्यायापेक्षां जास्त अर्थ नाहीं असेंच समजावें. शेवटचें काम म्हणजे आभारप्रदर्शनाचें. पुस्तक सुंदर छापून दिल्याबद्दल श्रीयुत सरदेसाई यांचे आभार न मानणें सत्याला धरून होणार नाहीं. पुस्तकांत घालावयासाठीं आपला फोटो दिल्याबद्दल मिस् हिराबाईंचा मी ऋणी आहें. रसिकांनीं हंसवृत्तीनें या काव्याकडे पहावें अशी विनंति आहे.

३०-१-३३
कोल्हापूर

मनमोहन

का. १०८२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४९४८७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# उद्धार

## विषयप्रवेश

ही पृथ्वी दिनरात फेर धरिते सूर्याचिया भोंवतीं,
माझें चित्त तसें कुणाभवति हें पिंगा करी संप्रती ?
वृक्षाच्या कटिभाग चांगुण करी गंधोद्धता वल्लरी,
हा शृंगार खरा परात्पर असे, जल्सा न वा जांबुरी !
शोभे नांव 'हिरा,' हिरण्मय तुझीं, चंपावती ! लोचनें;
त्वद्वात्सल्य तसें, पिलांस्तव मुखीं सुग्रास अक्रोच ने.
सारंगीपरि बोल काढित तुझी ग्रीवा असे देवकी,
गाण्याहूनहि गोड भाव हृदयीं राहे सदा देव कीं !
जैशी पेशल सूत्रबंध फिरते मेघांमधें वावडी,
माझें जीवन पंगु मात्र, तुझिया स्कंधावरी कावडी,
छायाचित्र न गुन्तवी सजिवता, तें फक्त घे आकृती
माझ्या भावकळा त्वदीय हृदयीं सामावण्या वक्रती.

## अझाद मैदान

गुन्तें मी भवसागरीं मगरिच्या दाढेंत मत्तंगज !
झालें जीवनवस्त्र जीर्ण, न लगे मोजावयाला गज !
होती तोवरिं अर्पिली सरसहा श्री मी तुझ्या कारणीं !
दातृत्वेंच हरे अनेक म्हणती तो कर्ण बाका रणीं !
माझ्या मानसमंदिरांत महिला मातेसमान् मानितों,
सावित्रीपरि एकनिष्ठ वनिता वेदासमान् पूजितों !
गौरांगाहुन श्वेत हृद्य सुफलां आहेच सख्याई तें,
शोभे नागफणी मुलायम परी पोटीं विषःकुंभ ते !

स्वातंत्र्यास्तव व्यक्तिमात्र लढती संभोवतीं पाहतों !
दास्याची जडशृंखला जननिला, कैं साहणें दाह तो ?
घेवोनी करिं ‘ हिंदकेतु ’ गुणिला त्या गोळिबारांतुनी,
भूमीखातर प्राणयज्ञ सजवी रक्तार्घ्य तें अर्पुनी !
कैसा हा परतंत्र भारत यदा वीरांगना जन्मती ?
क्रांती घेईल जन्म तीस बाधतां सिंहासनें कांपती !

## गोळीबार

ही माथ्यावर एक, आणि दुसरी पोटावरी बैसली,
“ माझा भारत ” शब्दसूक्ति तुझिया ओंठावरी नाचली !
माझें प्रेमनिधान भूषण असे, देशा ! सुसंभावना !
शौर्याचा पडसाद, दिग्गज पहा नाचे तुझ्या कीर्तना !
काळाचा अनिवार हात हरवी सम्राटही दीनसा,
कीर्तिस्तंभ, मिनार, लेख, मनुजा संदेश देती कसा ?
सत्याचाच जिथें निवास, हरवी मृत्यूसही तो नर,
साधुत्वेंच उरे चिरंजिव जगीं, देवासमान् वानर !
शुश्रूषालय थोर, थोर हृदयीं दाता किती सांगतें,
कोता ताजमहाल याहुन, इथें दीनव्यथा भागते !
सौंदर्यावर दृष्टि ठेउन कुणी दूरावती धर्म तो,
नांवाचा न मिनार यद्यपि जगीं विख्यात हो धर्म तो !
गांधींनीं ‘ सुरुवात ’ शब्द म्हणतां लाखावरी धांवले,
तूं त्यांतील प्रसन्न एक, लढशी सत्याग्रहीं, प्रेमले !

## मरणाच्या दारांत

सत्यासत्य कळे न अज्ञ असतां, विद्यावती तूं खरी,
आकर्षून जगास घेइ सकलां विद्युत् तशी वैखरी !

तें विस्तीर्ण ललाट त्यावर असे काळी रुजाम्यावरी
केसांची धनसंपदा; उभविते लाटा प्रपंचापरी !
लेवोनी सितवस्त्र तत्पर उभ्या सत्सेविका मंचकीं,
तूझा देह अचेतन, प्रकटवी नैराश्यता मूर्त कीं ?
तें निष्णात, परंतु देव हरवी यत्नच्युता मानवा !
हा अंधार अभेद्य फोडुन पुढें जावूं कसा वानवा ?
प्रेमाचा परिपोष जो न पुरता झाला असा शेवट !
पृथ्वीच्या प्रलयांतही उरतसे मातें कुठें तो वट !
आधाराविण वेल का फुलतसे मी गे जगावें कसें ?
पैशावीण विशेष काय मिळतां मार्गीं रिकामे 'कसे' ?
देवा धांव ! पहा सखी मम पडे, घायाळुनी संगरीं,
खर्ची पुण्य मदीय आजवरिचें, दातृत्वता ही खरी !

## अद्वैत

माझी जीवनचंद्रिका विकल हो, आहे पहा पौर्णिमा,
गेलें वैभव शारदीय दडली माझी विभूती रमा !
जैसा कृष्ण नभांकित प्रभु दिसे ईशाक्ष तेजोहत !
झाल्या व्याकुळ सेविका, नयनिं ये प्रेमार्द्रता वाहत !
आशादायक स्वप्न कालच न कां निद्रिस्त मीं पाहिलें,
अश्रूंचे मणि वेंचुनी प्रभुपदीं भक्तापरी वाहिले,
कोठें लुप्त असे दयाशिल विभू भक्तव्यथा हारवी,
संध्यारंजितरंग काय विरवी माझी व्यथा ह्या भुवीं ?
ये अद्वैत, तुझी कुडी मज दिसे साक्षात् निराशालय,
गेले जीवनसंगितध्वनि कुठें, कां होय मायालय ?
स्मीतच्छेदित रक्तरंग अधरीं गुंते मनोभावना,
सीताशोध करावयास्तव निघे श्रीरामशोभा वना !

दोघांचा प्रियभाव विंधुन चले मृत्यू शिकाऱ्यापरी !
ने खेंचून मदासु, ना तरि, विभो, नेशी तिला कां दुरी ?

## हिरेंमाणकें

आहे शास्त्रकलाविशारद जरी हा बुद्धिमान् मानव,
सृष्टी त्याहुन थोर तीहुन असे तो शक्तिमान् माधव !
बुद्धी पंगु ठरे असे कितितरी प्रच्छन्न येति क्षण,
देवाचीच दया दव्याहुन करी जिवाणुचें रक्षण !
श्वासोच्छ्वास करी मनोज्ञ शुकसी त्वन्नासिका विग्रह,
दावी तो हृदयस्थ भाव, सय दे दर्यांत दीपगृह !
आकाशीं गृहमालिका, तनुवरी त्या चंद्रिकेच्या कला,
मी हो प्रेक्षक, भाग्य थोर म्हणुनी मृत्यू जरा थांबला !
शक्तीशून्य हताश लोचन दिसे निस्तेजले हीरक !
काया नाजुक ही मनोज्ञ गमली मृत्यूस आकर्षक !
हें संगीत घुमे, प्रभंजन करी विस्तार वीचींसवें;
डोलें गायक सयश:परिमलें दु:खामधें हांसवे;
मृत्यो, का तुज ये दया न; असलीं नेशी हिरेंमाणकें ?
भूमीभार असे किती जगविशी, त्यां ठेवशी कां सुखें ?

## देवाची दया

देवाची प्रकटे निरागस अशी प्रेमाभिमानद्युती !
संपे संकट, हास्य गेहिं फुललें, आर्ताश्रु अन् मागुती !
सौख्यग्रास करावया उसळला एकाकि जैं अन्तक,
भक्तांचें कळलें स्वरूप; तिमिरीं झाला प्रभू दीपक.
बुद्धख्रिस्तमहंमदास हृदयीं मी सारखे मानितों !
जो आचारविचार शुद्ध कुणिही, सन्मानितों शूद्र तो !

माझा थोर कुळांत जन्म, विमले, तूं अंत्यजाची सुता !
गेला काळ जुना, न द्रौपदि म्हणे, 'मी ना वरी या सुता!'
पार्थाहूनहि कर्ण थोर प्रभुला शत्रू तरी आवडे !
मित्राच्यास्तव मृत्युलाहि वरिलें; विन्मूख सौख्याकडे !
सर्वांहूनहि पूज्य भारतिं असें सांगे मनोभावना,
शोभे तोच प्रभावि नायक रणीं; मार्मीक संभावना !

देवाचीच दया, प्रिया मम निघे त्या काळडोहांतुन,
"माना देव!" "भजा तयास" असला ये नाद व्योमांतुन!

## शुभ मंगल

व्यक्तीचें कुलिनत्व जन्मद नसे, आचारधर्मांतुन !
ये गंगौघ जगांत वद कुठुनी, त्या श्याम शीळेंतुन?
ज्या चंद्रास कवी कलात्मक भजे तो कर्जदारी करी !
जीचें तेज परप्रकाशित असे, ती हीन शक्ती खरी !
टीकाकार द्विजिव्ह किम्मत न दे माझी प्रतापी मती,
रूढीभंग करून मी करितसें ही अत्यंजाशीं रती !
सृष्टींतील मनोज्ञ फुल्ललतिका तो आपुला मंडप,
पाणीदानिं तुझ्या सुसंगत असे, सृष्टीसती प्रेक्षक!
आशीर्वाद विकून पोट भरती ऐसे नको ते भट !
कोकीळा करि गूजगान, स्वर ते, छे, छे! सुधेचे घट
पक्षांचें श्रुत मंगलाष्टक, धुकें हे शुभ्र अंतर्पट,
अंगाशीं बिलगून चुंबन तुझें घे; रानवारा खट!

सूर्यासाक्ष तुझें करग्रहण मीं केलें, हिरा, हांस तूं!
माझें सौख्यहि तूंच, तूंच विभुही; मत्काव्यसंसार तूं !

## गृहत्याग

झाला क्रुद्ध पिता सनातनि; मला गेहांतुनी काढिलें,
जातांना जननी मनीं गंहिवरे, वात्सल्यकोलाहलें !
माझ्या दुःखसुखांत आजवर जी वांटेकरी जाहली,
ती माता मज पूज्य, क्षेत्रच जणूं ती भासते माहुली !
स्कंधीं ठेवुन मान हृद्य उघडें केलें जिथें शैशवीं,
तीतें सोडुं कसा, सुबुद्ध न रमे सोडोनि आत्मा शवीं ?
केलें आर्जव अश्रु सांडुन परी ना ये पित्याला द्रव,
माझाही अभिमान जागृत सवें केला पुरा तो स्तव !
संपत्तीवर लाथ मारुन निघें, मी एक वस्त्रासह—
ओलांडीन भवाब्धि, तारक सखी, कांहींच ना दुःसह !
लाभे पर्णकुटींत सौख्य न मिळे प्रासादभागांतही
मार्गप्रेक्षित बैसली सखि, तिला सोनें सख्याची सही !

सीता जाइ वनास, कोमल तरी, त्या रामचंद्रास्तव—
आणी मी वनवासि आज बनलों माझ्या सखीच्यास्तव !

## संसारसुख

स्नेही आप्त मला सदोदित कसे धिःकरिती निष्ठुर,
माझ्या मन्गटिंचा प्रचीतित कळे त्यां मेषकां मग्दुर !
थोरांनाहि विवंचिता बनवितो घेतां परीक्षा प्रभू,
ग्रामत्याग करून मी तुजसवें दूरावली मातृभू !
गांधींचें मजला अमान्य न रुचे भीरू अहिंसाव्रत,
क्रांती काय अशी फुकी घडतसे रक्ताविणें अद्भुत !
लागे भाकर घाम गाळून असे जी मेळविली पुरी,
चैनीच्या चवचाल चालि सुटल्या ती हौस मेली पुरी !

रावावें दिन, रात्र रम्य तुजला शृंगारण्या घालवी,
तारुण्योद्धत कामिनीस सुख तें, रात्रीं सखा हांसवी !
आणोनी गजरा मृदू निजकरें तूं शोभवी मस्तक,
द्यावें सोडून केशवैभव पडे पाठीवरी तक्षक !
जैं प्रेमार्द्र तुझ्या विशुद्ध हृदयीं नाचे तरंगावली,
माझा आदरभाव हो द्विगुणित प्रेमामुळें, भाविली !

## शिक्कामोर्तब

जैं माझ्या मणिबंधनांत गत्रसले काया तुझी कोमले,
जैं वाऱ्यावर मुक्तकेश उडती रेशीमसे शामल !
तैं ओंठांस भिडून ओठ मनिंचा मीतूंपणा लोपला,
रानींच्या मृगशावकापरि तुझी सद्भावना निर्मला !
हें बाजूस पडे अहा गळुनिया कंठातलें भूषण,
चोळी ही सुरसंगरीं चिरतसे, कित्येक गेले क्षण,
गेला भांग सखे, तुझा विखरुनी, शोभा कुचांची खुली
दोघे तन्मय ते विलास करितां, शुद्धी कुणा राहिली ?
स्त्रीसंगाविण जीवनांत कुठली प्रेमप्रतापी रती ?
झांशीची रणरागिणीहि, विदुला, संयोगिता प्रेमि ती
डोळे विस्तरुनी न्यहाळशि मला, तैं वाटते आरती,
देशोद्धार करावयास जणुं तूं घे जन्म या भारतीं !
गुंगे मोहक मोहिनींत शुभगे रंगेल माझें मन,
प्रेमाच्या खलित्यास मोहर करी हें गालिचें चुंबन !

## सुखाचा शोध

क्लेशत्रस्त यदा तुझ्या स्थिरतसे माथा अजानूंवर,
चैतन्यद्युति ये नवीन शरिरीं संयोग हो नावर !

दु:खाचा परिहार होइ सहजीं भृभंग होतां क्षणीं !
सिंहाला पडती न कष्ट विपिनीं जंबूकसंहारणीं.
तासामागुन तास संपुन रवी यावा नभःप्रांगणीं,
प्रेमी काळ-विचार कां करितसे त्या रात्रिच्या रंगणीं !
" प्रेमांतील सदैव जागरुकता दे अंधता हो दिशीं, "
केला हृद्य विनोद " लावुन पहा नाहीं जरी चाळिशी "!
थोड्या मासिक वेतनांत मनिषा मानी समाधानता,
या वृत्तीविण हास्य गेहिं न कधीं कोणास ये आणतां!
त्या लास्यांत तुझ्या जवाहिर दिसे हे राजराजेश्वरी,
अर्धांगी करिं मी तुला हरिजना, ही प्रेरणा ईश्वरी!
श्रीमंतींत नसें विशुद्ध सुख तें; विद्येंतही नाढळे,
साधूंच्या हृदयांत दुष्कर अशी संतोषता आढळे!

## दख्खनची राणी

मांसाहार जरी खरा प्रिय तुला, तूं सोडिला कायम,
हत्या घोर महान पातक असे होतां स्वतःही यम!
आतिथ्यास उणें कदापि न करी त्या गेह तूं वाहिलें,
वाटे सार्थ तयांस दारिं तुझिया ' सुस्वागतम् ' पाहिलें!
ऑफिसांतिल मित्र मंगल सणीं येती घरीं पाहुणे,
मिष्टान्नाग्रह, दक्षणेसह करी तूं प्रेमभावी गुणें!
जेव्हां सिंहकटी तुझी लवघवें तैं वाढतां वाढतां
स्थीरें ग्रास करीच नेत्र रमले शोभा रमा पाहतां!
गौरांगास तुझ्या लपेटुन खुलें हें शर्बरी पातळ,
भासे शैलतटींतुनीं झुळझुळे मंदाकिनीचें जळ !
किंवा कृष्ण नभांत रूप शशिचें होई परावर्तन,
राणा दख्खनची अहा करितसे घाटांतुनी नर्तन,

उत्प्रेक्षा सुचती कितीक पण ना तारीफ होई खरी!
स्फूर्ती पंगु ठरे विरंचित बने त्वद्वर्णनीं वैखरी.

## विश्वासस्थान

ओंठाआड दडून कुंदकलिका अस्फूटशा हांसती,
घेतां चुंबन नासिकेस शुभगा देते अहा वास ती!
पापाचा लवलेश ना तुज शिवे तुं कामिनी वा सती?
दर्वेशी जगता मदारि, जन हे पुंगीसवें डोलती.
'देवी' मी तुजला, 'दिनेश' मजला तूंही म्हणावें सये.
कोटी मी करितां सुबुद्ध तुझिया गालावरीं हास्य ये!
होई वादविवाद नित्य कविता वा धर्मग्रंथांवरी,
होई गोड समेट हट्टि न तुझी वृत्ती मृदंगापरी!
जेव्हां मासिक धर्म होय म्हणुनी अस्पृश्यता पाळशी,
"तूं अस्पृश्य म्हणून ना तुज शिवें, मी" तें म्हणावें तुशीं!
घ्यावा फक्त विनोद त्यांतिल, तुझी हंसापरी संस्कृती,
माझ्या भावविनोदरम्य कविता स्तुत्यर्थ कां गाइ ती?
मी बंदिस्त तुझा गुलाम सखये तूं तार वा मारही,
कोरा कागद देउनी तुजपशीं केली असे मीं सही!

## स्त्रीजात

व्यापी [illegible]व चराचरा, जगतसे ब्रह्मांड कोणामुळें?
पाताळावरि खोलखोल जिचिया प्रेमादिकांचीं मुळें!
जैशी दे अरुणप्रभा जडचला संजीवनी मंगला,
आधारेंच तुझ्या प्रफुल्ल मनिषा हांसेल ही मंगला!
धन्य स्त्री मनुजास जन्म सुख दे देवाहुनी थोर ती,
धन्य स्त्री मनुजासवें करितसे प्रेमप्रसंगीं रती!

पुष्पाहून जरी सुकोमल तनू वज्रासही भेदते,
दु:खी पाहुन प्राणनाथ सखिची काया पहा स्वेदते!
त्वन्नामाक्षर रामनाम परिसे दैनंदिनी घेत मी,
जैसा दीप तरून नेइ मनुजा, ये अंधता जैं तमीं!
सोडोनी गगनस्थला मज गमे माझी करी सांगता
कोणी शापहता तव स्वरुप घे, वेल्हाळ ही देवता!

गीतें गाइन मी तुझ्याचकरितां वाहीन पुष्पें तुला,
आशीर्वाद तुझाच दाविल दिशा पुण्यार्थ जी हेतुला.

## स्मृतिस्थळ

आगामी विधिनें कळे न मनुजा भालावरी चित्रित,
गुन्ते जीवन वर्तमान—पुढच्या अदृश्यताकात्रिंत!
पैशाविण कसा मनीं तळमळे मी दानधर्मास्तव,
देवाला विसरे न सौख्यसमयीं, होई न तें वास्तव!
आकस्मात अघात होउन यदा होतीस रुग्णालयीं,
येईना गुण, वैद्यकीय तिथल्या मात्रारसांच्या पयीं!
काळें घेऊन अंगवस्त्र तुझिया कंठावरी फांसणी
होता टाकित अन्तक क्षणभिहीं त्या पाडण्याच्या सणीं,
तेव्हां धांवुन ये प्रभूच गुणिले ही केवढी गे दया?
हृत्पुष्पास खुलून आंतिल मधू काढून दे गेंद या!
सायंकाळ सकाळ वेदवचनें उद्गारिते उज्ज्वल,
तद् अर्घ्यास्तव लोचनांतिल मिळे भक्तीरसाचें जळ!

सद्भावाविण जे निरर्थ करती प्रेमस्तुती मित्र जे,
ते शत्रूच मला, खरी न कविता त्यांच्या प्रसादें सजे!

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ठाणे



## कलिप्रवेश

होतो नोकर मी तिथें प्रकटुनी दुर्दैव प्रस्थान दे,
येतां वाहुन मच्छ फेंकुन तटीं धावा त्रयस्था नदें!
दृष्टीला रुचला न मालक, नव्हे होतां महा मद्यपी,
पापाचार करी, धनास्तव अहा, जीवाणुचें रक्त पी!
"मी येणार चहास आज तुमच्या गेहीं" म्हणाला मला,
शिष्टाचार म्हणून "होय" म्हटलें, त्यातें हवी शामला!
दृष्टीला पडतां तव स्वरुप तो उल्हासला आंतुन,
"मोठें भाग्य" म्हणे, असें न दिसतें रूप प्रसादांतुन!
कोणी सुंदर जी पदार्पण करी तारुण्यता-मंदिरीं
देखोनी युवती मनांतुन झुरे, भ्रष्टावया ती परी!
केल्या भ्रष्ट कितीक पुण्यललना, होत्या कुमारी किती?
बाला ज्या असहाय पुत्रवति, त्या त्याची दया भाकिती!
"हो, हो" बोलुन मी प्रसंग तिथला शोकान्त फेंटाळला,
वाचे जीव तदा परंतु पुरता मृद्हस्त कीं पोळला!

## त्याची मृत पत्नी

पत्नी साधु, कधीं तिला न बघवे लीला पतीची अशी,
हो संसार दुभंग, नेत्र भरुनी ओलावली तैं उशी!
त्याचें काय तया? विरोध करतां मारी पशूसा तिला,
मृत्यूलाच पुजी, नकोच जगणें, काया मिळो मातिला!
धांवा ऐकून ये अचानक तिला ने काळ देवाघरीं,
"गेली ब्याद" अशीं उदीरित करी त्याची वचें वैखरी!
स्त्रीसंगाविण वैषयीक बनली दृष्टी विधूरापरी,
बुद्धिभ्रष्ट विचार, भ्रष्ट बनला, होई यमाची पुरी!

येई गेहिं परस्पर, प्रकटवी तो तेधवां लाघव,
ठेवायास खुषी; अलंकृत करी, गोपींतला माधव !
बोलोनी हितगूज प्रेमळपणें विश्वास संपादला,
सर्पें चंदनवृक्षभार सगळा पुच्छामधें वेढिला !
धर्माला दिसलें गुणी जग, तसा तो वाटला सुज्ञसा,
व्याधाचा शर लागतांहि कळतो, आधिं न तो फारसा !

## स्त्रीस्वभाव

अब्धीचा कळतो न थांग वरुनी साधा खडा टाकतां ?
आरंभीं बघतांचि येइ न कसा माणूस हा सांगतां ?
खोटा ठेवुन मित्रभाव निजतां मांडीवरी ठेवुन
स्नेही मान, चराचरां चिरतसे, छाया नसे, तें उन !
गेलें राज्य पराक्रमी विषय जैं राजास घे विंधुन,
झाले निष्प्रभ वीरही विषय जैं शक्तीस घे जिंकुन !
विद्यावंतहि हो, हतप्रभ तिथें हा अज्ञ कैसा रिघे ?
तृष्णा व्याकुळ जीव दीर्घ विपिनीं पंकांतलें वारि घे !
लाभावा सहवास रोज म्हणुनी दे धूरचाकी तुला,
एकान्तांत करी विहार तरि तूं, ना हेरलें हेतुला !
" शोभे हें मुख, " वर्णि " चंद्र जणु दे येऊन येथें तळ
शोभे रम्य फुगीर केशरचना, कानांवरी कुंतळ ! "
त्याचें कर्षि शरीरसौष्ठव तुला श्रीमंत तो त्यांमधें,
माशी एक फुलावरी न ठरते, हापापली जी मधें !

## स्त्रीस्वातंत्र्य

स्त्री जाते हुरळून ऐकुन तिचें सौंदर्यतावर्णन,
स्वाभाविक असा स्वभाव विधिनें तीतें दिला तूर्ण न !

तूं त्याला अपवाद काय? पुरतें त्यानें तुला हेरिलें,
सत्या आकळल्याविना कुणि कुणां रोषांत अव्हेरिलें?
स्त्रीस्वातंत्र्य असे मला प्रिय, तुला ना ठेवलें बंधनीं,
माझ्या गेहिं म्हणूनिया कडकडे त्या दांभिकाची धुनी!
माझ्या मुग्धपणांत दीर्घ दडली संताप-उद्विग्नता,
त्याचा अर्थ तुला न ये कळुनिया, अश्लाघ्य ही अंधता!
चाले हास्यविनोद निर्भयपणें माझ्यापुढें बोचक,
काव्याच्या जनकास काय विसरी मर्मज्ञ सद्वाचक?
झालें हें विपरीत हाय, निखळे संतान हें स्वर्गिचें,
स्वर्गश्रेणि करी दुंभग दयिता कोणास ऐशी रुचे?
झालेला उपमर्द नक्र गमला दुःखाब्धिच्या वैभवीं,
झालें मस्तक सुंद, संशय हरी शुद्धी, जशी शांभवी!

## हृद्रोगास मिळेल औषध तरी....?

तत्सद्दर्शन कामुका परी तुला दे भाव उद्दीपन,
संर्गी भस्म करी पतंग हळवा, ती हीन कां ज्योति न?
पंकांतून अधीर प्रेमळपणें जें पद्म मीं काढलें,
अव्हेरून मला, कृतघ्न बनुनी आतां नदीं टाकलें!
अद्वारें शिरला निशाप्रिय कुणी कान्ता धनाकारणीं,
सद्बुद्धी न करील व्यर्थ दुजिया शेतामधें पेरणी!
केला ना अटकाव स्तब्ध बसलों जागा असें मी भयें,
यत्नावांचुन चालुनी न सहसा कोणाकडे लाभ ये?
आणी नित्य नवे गुलाबगजरे शृंगारण्या रूप तें,
हर्षाची उकळी घरीं न हृदयीं आकाशिं वा मावते!
माझ्याशीं वच बोलतां मुळिं न ये गालावरी ती खळी,
आमीषास भुले त्वदीय मनिषा, मत्स्याकृतीशीं जळीं!

चित्तींच्या निवतील घातक अशा मृत्यूपरी भावना—
हृद्रोगास मिळेल औषध तरी.......... ?

## वांकडें पाऊल

राधाकृष्णविलास निर्भयपणें आचारिती हे जन,
त्यांचा देवपणा परी विसरतां, अक्षम्य हें वेज न!
कस्तूरीपरि मृत्तिका दिसतसे लावी शिरीं कोण ती?
यत्प्राप्तीस्तव एक वन्य हरणी झाली गतप्राण ती!
जासी तूं वनभोजनास्तव कधीं त्या दांभिकाच्या वनीं,
त्याचें रंजन व्हावयास म्हणशी अश्लिलशी लावणी!
घे अंकावरि ओढुनी कुच तुझे दावी कवेच्या मधें,
भृंगी तूं तुज अंकिता करतसे, रूपप्रभेच्या मधें!
दे सौंदर्य तयास देव, म्हणुनी ही काय गे फार्कत?
का सापेक्षसमास लग्नविधिचा नेशी विभक्तीप्रत?
वायू उन्नत हो यदा फडफडे घारीपरी वावडी,
फाडायास तयास धार पुरते त्याला नको फांवडी.
येते खालिं नदी परंतु वरती जातां तिला येईना!
गेलें पाउल वांकडें सहजही, तें नीट होईच ना!

## आवाहन

ग्रीष्मर्तु प्रिय पातला, विधु पहा सापेक्ष येई नभीं,
सूर्याच्या अति विक्रमास बहुधा चोराप्रमाणेंच भी!
स्वर्गंगेपरि ही प्रसन्न फिरते रंगेल मंदाकिनी,
जाया आतुर मी तुझ्यासह तिथें क्रीडासुखाकारणीं!
संपे रात, प्रचंड सूर्य वरती जीवा पहा तापवी,
कां तूं पार्थिव भावशून्य मजला, धिःकारशी या भुवीं?

स्थळप्रत
ग्र. सं. ग्रं. आवे.

वस्त्रें तापद, घालितों जगिं जरी हीं लोकलज्जेस्तव,
तीं कांठावर सोडुनी विहरतां होई सुखस्संभव,
हा उत्फुल्ल तुझा नितंब निथळे घर्में, निदाघीं रसा,
देई नम्रपणा शुचिर्भुतपणा, कापूस हो भारसा!
ही रेखीव तुझी शरीरघटना चित्रापरी वाटली,
हा नेत्रोत्सव हो दिवाळिपरिसा दृष्टी किती रंगली!

का. न. १९८

हें आवाहन मी तुला करितसें, ये ये सखे धांवुनी,
सावित्री जशि धांवली पतिअसूकार्यार्थ वेधावुनी!

## जनताजनार्दन

हें विख्यात विहार-मंदिर, छतीं रत्नें जडावीं, तळीं,
प्रेमी येथ किती प्रसन्नवदनी संयोगिता जाहली!
रूपाचा गुणभार, त्यांत चढलीं कायेवरी मौक्तिकें,
ये अंगास सुगंध लावुन झणीं, भोगावयाला सुखें!
येथें कातळ हे कडेस बसुनी विस्तीर्ण छायेमधें,
तूं माझ्या हृदयांतला, प्रियतमे, संभाषणीं ठाव घे,
उल्कापात मनोज्ञ, आणि शशिचा पाहूं मनोवेग तो
झाला हर्ष, चकोर मंडळ नभीं गीतध्वनी काढतो!
विद्युद्दामविलास मेघपटला आच्छादुनी चालतो,
वेश्येच्या इमल्यांत प्रेमि शिरतां चौफेर न्याहाळतो!
स्त्रीसंबंध असेच चोरुन जगीं कां चालती नाकळे,
कुक्कुट् झांकुनि लांबते न रविची वेळा प्रभातीं बळें!

पड्द्याआड बसा, प्रभुस्तुति जरी केली तुम्ही स्त्रीसवें,
“ नक्की ” तो जनताजनार्दन म्हणे, “ संभोगता संभवे! ”

## ‘ चंद्रिकाऽऽ ही ऽजणूं ’

गालाच्या खळगींत धुंद मदिरा द्राक्षारसाची असे,
येवोनी जणुं काजुबीज तुझिया सन्नासिकाग्रीं वसे!
अंतर्याम नसेच निर्मळ परी डोळ्यांतलीं अंबुजें,
धेनू लाल पटा, तसा निरखितां रूपास मी हा बुजें
लाभे गंध सुखात्मता, सखिमुखोच्छ्‌वासांतुनी आगळी!
केसांना मुरडून ये श्रुतिवरी ती भासते पाकळी.
कंठांतून निघेल गीत, घुमतां पायांतले पैंजण
जीवा मंजुरवप्रभाव सुखवी शाबासकी दे जन!
हा बाजूस बसून वर्तवि कुणीं प्रेमी जनांची युती,
शब्दश्रेणि गमे मनोहर मना वाटे ग्रहांची युती!
नाथांचा सहवास आठवण दे लक्ष्मी मन:कैरवीं,
मेघश्यामलरूप रंजित करी, दु:खांमधें हांसवी!
सारंगीवर ‘ चंद्रिका हि जणुं ’ हें गाणें कुणी वाजवी,
उत्प्रेक्षामय तो उचंबळवि तो गूढार्थ चित्ता जवीं!

## पराक्रमी प्रेम

मेंदीचा रस रम्य चित्रित करी आरक्तवी पाउलें
वाटे कीं उभवी विवक्षित पदन्यासातुनीं राउळें,
चित्तींची मदनव्यथा प्रबळ हो, गारूड हें का असे?
दे गुंजारव तो पदध्वनि तुझा ज्योत्स्नाप्रचीती वसे.
प्रीतीचा मनुजास हात मिळतां स्वर्गासहि जिंकि तो!
लैलामंजुन अन् शिरीनफरहाद् यांची कथा वाचितों!
हें तारुण्य, विरेल नाजुक जशी कोमेजते पालवी,
मारी काळ चराचरास कथितो हा सर्वसाक्षी रवी!

प्रीतीनेंच जगांत आज दिसती नानाविधा भूषणें,
कैचा ताजमहाल ना तरि तुम्ही आम्ही इथें पाहणें?
काव्यें त्याचमुळें जगीं प्रकटती हा का कमी फायदा?
प्रीतीचा पथ राजमार्ग सकलां निर्बंध ना, कायदा!
क्रीडा हास्यविनोद जेथ चलतो देवांगनांशीं सदा,
त्या तेथेंच खरा कवी रमतसे उल्हासते शारदा!

## पक्षभेद

शृंगारादि रसोदधींत वरितो सायुज्य मुक्ती नर,
आमोदग्रहणीं विलोकुन झुरे तो यक्ष अन् किन्नर!
वर्णी प्रेमविवाह भासभवभूतीकालिदासादिक,
लोपे द्वैतपणा, हवे मग कशा तो यज्ञ अन् आन्हिक!
दृष्टीला न रुचे प्रदर्शन कधीं नाविन्यतेच्या विना,
काडीमोड म्हणून आज घडती माझी अशी भावना!
शक्ती धुंडितसे नवीन कसली कर्तृत्वता गाजवूं?
स्त्री कामातुर रूपवान युवका पाही सदा गुंतवूं!
स्त्रीला काय जबाबदार धरतां निर्माणकर्ता धरा,
ईशानें मदनव्यथाच दिधली कां? प्रश्न त्याला करा!
जो रात्रिंचर नित्य नित्य फिरतो वारांगनांच्या घरीं,
तो होतो न बहिष्कृत, प्रकृति ही कां पक्षभेदी खरी?
वायूसा जनताजनार्दन मतें अस्थीर बेवारशी,
झोडी पाउस, भूपती छळितसे, फिर्याद द्यावी कशी?

## सुधारक

स्त्रीपावित्र्य तुम्ही सुलाखुन बघा सोन्याप्रमाणें, परी
ठेवा तोच कटाक्ष हीन-दुबळ्या त्या पौरुषाच्यावरी!

जें स्वातंत्र्य तुम्ही परांकित अतां हक्कामुळें मागतां,
तें द्या आज तयां, तयाविण न हो या उक्तिची सांगता !
सोडा तत्त्वविचार, राजरमणी धि:कारिते भूषणा,
तें सौंदर्यविलासदर्शन मना दे गूढ संवेदना !
बांधेसूद शरीरसौष्ठव पटें ती लाजते झांकतां,
होई शर्मुन चूर तेथ दयिता, चेष्टेंत प्रश्नापिता !
वेढी मल्‌मल वस्त्र तें सलिलसें कुंभापरी जोबन,
तत् अग्रावर हेम शुभ्र सुमनें, नैनांमधें अंजन !
सिंहींसा कटिभाग, रत्नमणिंनीं शृंगारिलीं पाउलें,
आशा, प्रेम, समुन्नती विकसती चित्तामधें यामुळें !
जी पाश्चात्य तऱ्हा सुशिक्षितमतें आचारिती या मुली,
त्यानें होइ पहा अध:पतन हें ही बाब ना मामुली !

## सुरत संग्राम

ते प्रेमातुर जीव तैं निगटती अव्हेरुनी भिन्नता,
नाथाच्या अति आग्रहें हळुहळू स्वीकारली नम्रता !
ओंठांतील सुधारसास मिळवी तो भृंगसा चुंबनीं,
शक्तीचा मकरंद ती लुटतसे छातीवरी बिल्गुनी !
जाई त्या सुरतप्रसंगिं सगळी उद्विग्नता खिन्नता,
हो उत्फुल्ल अजानुबिंब, कुचही आरक्त तीं तत्त्वता !
का लज्जान्वित मौन हें, प्रियसखे ? ही प्रेरणा ईश्वरी,
हर्षानें श्रवणीं मनोज्ञ पडती चीत्कार कांता करी !
इच्छेची परिपूर्तता तुजविना यावन्य भूमीमधें,
कोणाच्या सहसंगतींत करणें कायेस आधार दे ?
जावी वीज नभामधें चमकुनी नेत्रां दिसे ना दिसे,
तैसा तो क्षण मैथुनप्रगतिचा संमोहितो मानसें !

येऊं दे, दयिते, दया, गहिंवरें निःशब्द हो भावना,
हातीं घेउन कांच, हाय करिशी सन्मुक्त संभावना !

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद क्र. ....... ठाणे

## स्मृतिस्थळ

पूर्वीचा स्मरतो न काय तुजला संसार अत्युत्तम,
ही शोकान्त विलापिका रडविते; कोठें हिचा उद्गम ?
विद्यार्थी असतां प्रकर्षितपणें त्या विश्व-विद्यालयीं
केला बोध अमोल, आशय असा, विश्वास ठेवा नयीं!
स्पृश्यास्पृश्य विचार निंद्य, न शिरे मैत्रीमधें आपुल्या,
नामोच्चारमिषें उदीरित करी त्वन्नाम रूपावल्या !
काळाचा रथ वेगवान भगवन् चित्शक्ति कासावली,
ती हातांत न सांपडे जवळची, पाण्यापरी सावली !
तैं एकत्र मनोविनोदनमिषें गेलों विहारावया,
अस्मन्मेलन अश्रुयुक्त; शुभगे, सायंतनी व्हावया !
वेणींतील फुलें प्रफुल्ल नटलीं दृष्टी बने भृंगशी,
मोत्यांची दंवरूप झालर रवी संकोचितो शृंगशी !
गेला काळ किती परंतु विरलें ना चित्र जें कोरिलें,
हृत्पुष्पास इथें स्मृतिस्थळमिषें भक्तीमुळें वाहिलें !

## स्त्रीचारित्र्य असें महा गहन....

आकाशांत यदायदा प्रकटते ती शारदेन्दु प्रभा,
वाटे ती गृहमालिका, भरविली स्वर्गस्थ वीरें सभा !
शोभे हें मुखबिंब भंगुरपरी तेजप्रदायी रमा,
आकाशस्थित, येथला, किं मनिं मी मानूं, सखे, चंद्रमा ?
प्रीती जागृत होतसे रविकरें सृष्टी, सुषुप्ती निशा,
हातांतील गुलाब अर्पुनि तुला मी प्रीत दावूं कसा ?

माझ्या दुर्विधिदावदग्ध हृदया, तूं शीतकारी हिम,
कां जातेस मधेंच सोडुन अशी ! आलें पहा माहिम ?
झालों तीव्र दरिद्रतामय, सखे, कोणामुळें मी बरें ?
ये सोडून घरास, विद्ध हृदया, पाडूं नको तूं घरे !
नाथाच्या अपरोक्ष भोगसुख तूं देशी दुजाला कशी ?
का इन्कार करून नक्त, सखये ! दीनास दूरावशी ?

‘ स्त्रीचारित्र्य असें महागहन’—या उक्तीस पुष्टी तुझी,
कानाआड करून दूर पळशी मी मारिली हांक जी !

## उलटा न्याय

मी शत्रू न, सखाच ओढसि कशी कक्षेंतुनीं खालती,
देवी तूं सदसद्विवेकमतिनें घालीं गळां माळ ती !
ती राधा मनमोहनास्तव कशी वेधावली धांवली,
जाऊं काय निघून वंचितपणें आल्याच या पाउलीं !
हुंडा घेउनिया सजातिय मुली आल्या किती सांगुनी ?
अव्हेरून तयां सुधारक सखा तूंतेंच घे भावुनी !
स्वस्ति स्वस्ति सखे मनोरथ नको वाटेमधें थोपवूं,
काळव्याळमुखांतुनीहि आपुली मैत्री समुद्धारवूं !
येई आंधण, हें विचारजल ये पाखंडुनी हृत्तटें,
मी दर्यांत खळाळल्या गवसलों, अन् हा तराफा फुटे !
लोहस्पर्श, परीस काय म्हणुनी हापापुनी भाविल,
बुद्धीहीन समुन्नतीस्तव बुधा भेटावया जाइल !

अज्ञानें तुडवीत जाय स्वपदें ज्यांची खरी ती ऋणी,
हर्षें गोधन पाडसांसहचरें रानीं मृदूल तृणीं !

[stamp] म. सं. ग्रं. आये.

## अपुरी मानवबुद्धि

शिंपाशंख मिळावयास्तव जळीं कोळी कधीं जात ना,
देशी पर्वततुल्यशा उभवुनी या जीवनीं यातना !
मृत्यूचा अनिवार हात म्हणूनी शोकास ये सौम्यता,
मैत्रीला बिसतंतु तोडुन सखी दे छिन्नविच्छिन्नता !
सूर्याचा उदयास्त भाविक न जो अर्घ्याविना पाहतों,
प्रीतीचा उदयास्त विव्हळपणें मी येथ आलोकितों !
आणोनी मज दूरदूर विपिनीं कां सोडशी ? मी नमीं,
झालों मी अवनम्र गे तव दया-अब्धीमधें मीन मी !
आकाशस्थ रवीशशिग्रह परी त्यांच्या करीं जातक,
मानव्यास न पूर्णता लभतसे, वेदान्त हो पूरक !
संन्यासाश्रम येइ काय नशिबीं या प्रेमभंगामुळें ?
भंगेना प्रलयांत खोल रुतलीं प्रेमस्मृतीचीं मुळें !

आकाशास धरावया बघतसे हातांमधें मानव !
हें हास्यास्पद, भौतिकाविण करी कोणी न याचा स्तव !

[stamp] दा. क्र. ८९४०

## संमोहन

कीर्तीचा पडसाद ना घुमतसे एक क्षणाभीतरीं,
दुष्कीर्ती पसरे क्षणामधि, नये सद्भावना अंतरीं !
बभ्रा होय जगांत लोक करती माझी हुरे रेवडी,
ऑफीसांत क्लबांत याचविषयीं चाले कुचेष्टा बडी !
निंदा नर्मविनोद ऐकून मला व्हावें कसेंसें मनीं,
सीता हाय दुरावली वनिं पहा, हा राम वेडा मनीं !
देवा, ठेव तिला खुशाल कुठल्या देवूं नको यातना,
नादाच्या अनुरूणनार्थ सगळ्या तारा हव्या वादना !

पश्चात्तापविदग्ध अंतर तुझें होईल कालांतरें,
सूर्याच्या किरणच्छटा न विरती दूरावता अंतरें !
माझें दैव असें, अतां तरी कसा मी दोष देऊं तुला ?
ओंवाळून मदिय जीव तुझिया ओटीमधें टाकला !
हा संमोह विचित्र मत्स्य न तरी कैसा धरावा गळें ?
मोहानेंच कितीक मित्र जगतीं पर्णापरी पांगले !

## हतप्रभ चंद्र

तूं झालीस फितूर, सोडुन मला घेशी उडी नावर,
होतें चित्त तुझें जुईपरि अतां तें हो कसें फत्तर ?
दे दुर्गंध अमाप निर्मल मनें जें मानिलें अत्तर,
कीं माझाच शरीररक्षक स्वतः लावी खिशा कातर !
तूं कां भोगविलास यास म्हणशी, साफल्य संसारिचें ?
स्वप्नींध्यानिंमनीं सदैव करिशी कां ध्यान कंसारिचें ?
आरस्पानशशी नभांतुन बघे डोकावुनी खालती,
भूवीं, रम्य तुषार गौर निजल्या त्या अंगना, वानिती !
गेला गर्व विरून, तन्मय शशी हो, दृष्टि ना ती रिघे,
आली पांढुरता मुखावरि उडी साता समुद्रांत घे !
भूगर्भांतिल हालचाल न दिसे तद्वत् मनीं वादळ,
पांगोनी सुखरेणु मंडळ उडे, वायूविची चंचळ !
काटयांनीं भरला प्रवास वन हें दावानळीं सांपडे,
कान्तेच्या विरहव्यथेहुन असें संकष्ट हें बापुडें !

## विस्मृति

ते भिन्नाङ्गनसन्निभंनभ यदा पाण्यापरी भासतें,
ही तृष्णार्त जवान काळविट त्या भासाकडे धांवते !

आशेचे अवशेष पाहुन मना यावी नवी चेतना,
खोटी ती ठरतां, जिवंतपणचा मृत्यू पहावेच ना !
घेशी ओढुन कर्जदार म्हणुनी अंगांतल्या लक्तरा,
कां मानेवर ठेविशी चरचरां कापावयाला सुरा ?
कच्चित्प्रश्न विचारुनी उगिच कां मिथ्या मला छेडिसि ?
मी संकल्पबळें निवारिन तुला, देवी असे पाठिसी !
जें होणार टळे न, काय म्हणुनी सोडुं प्रयत्ना कसें ?
दैवाच्याहि दयेस लागति जगीं यत्नादिचीं आमिषें !
मंदीराहुन पूज्य सुंदरपणें प्रासाद होई कसा ?
ये ये धांवत साजणीं बघ किती हा शुष्कला गे घसा !
झालेलें विसरूंच, विस्मृति असे, संजीवनी आजची
सौख्याच्या क्षणिं व्यर्थ मी न उकरीं ती आकृती कालची !

## वाऱ्यावरची इमारत

धिक् धिक् जीवन हें असह्य बनतां कान्ता पराची जगीं !
घेतों मारून मी स्वतःस मज दे सानंद पर्वानगी !
देशप्रेम तुझें बघून तुजला मी आपुली मानिलीं,
दावी तीच पराक्रमी अदयता जी आज आपेक्षिली !
गेलेला सुखसंगतींत अपुला हेमापरी काळ तो,
वृत्ती तन्मयता प्रकर्षुनि पुन्हा दृष्टीपुढें नाचतो !
तैं हातांत तुझा धरून विजनीं मी हात उद्गारलों—
" हा एकत्र निवास राहिल असा, मृत्यूवरी, " हांसलों !
हांसे भेसूर काळरात, भवतीं माझ्या निराशा असे,
जातां भंगुन तार गाइल अतां संगीत वीणा कसें ?
अश्रूंचा शिडकाव हृद्य अनला दे ना मुळीं सौम्यता,
हा वाऱ्यावर बांधिला मि इमला ये घात ना सांगतां !

पश्चात्तापविदग्ध अंतर तुझें होईल कालांतरें,
सूर्याच्या किरणच्छटा न विरती दूरावता अंतरें !
माझें दैव असें, अतां तरी कसा मी दोष देऊं तुला ?
ओंवाळून मदिय जीव तुझिया ओटींमधें टाकला !
हा संमोह विचित्र मत्स्य न तरी कैसा धरावा गळें ?
मोहानेंच कितीक मित्र जगतीं पर्णापरी पांगले !

## हतप्रभ चंद्र

तूं झालीस फितूर, सोडुन मला घेशी उडी नावर,
होतें चित्त तुझें जुईपरि अतां तें हो कसें फत्तर ?
दे दुर्गंध अमाप निर्मल मनें जें मानिलें अत्तर,
कीं माझाच शरीररक्षक स्वतः लावी खिशा कातर !
तूं कां भोगविलास यास म्हणशी, साफल्य संसारिचें ?
स्वप्नींध्यानिंमनीं सदैव करिशी कां ध्यान कंसारिचें ?
आरस्पानशशी नभांतुन बघे डोकावुनी खालती,
भूवीं, रम्य तुषार गौर निजल्या त्या अंगना, वानिती !
गेला गर्व विरून, तन्मय शशी हो, दृष्टि ना ती रिघे,
आली पांढुरता मुखावरि उडी साता समुद्रांत घे !
भूगर्भांतिल हालचाल न दिसे तद्वत् मनीं वादळ,
पांगोनी सुखरेणु मंडळ उडे, वायूविची चंचळ !
काटयांनीं भरला प्रवास वन हें दावानळीं सांपडे,
कान्तेच्या विरहव्यथेहुन असें संकष्ट हें बापुडें !

## विस्मृति

ते भिन्नाङ्गनसन्निभंनभ यदा पाण्यापरी भासतें,
हीं तृष्णार्त जवान काळविट त्या भासाकडे धांवते !

[library stamps]

आशेचे अवशेष पाहुन मना यावी नवी चेतना,
खोटी ती ठरतां, जिवंतपणचा मृत्यू पहावेच ना !
घेशी ओढुन कर्जदार म्हणुनी अंगांतल्या लक्तरा,
कां मानेवर ठेविशी चरचरां कापावयाला सुरा ?
कच्चित्प्रश्न विचारुनी उगिच कां मिथ्या मला छेडिसि ?
मी संकल्पबळें निवारिन तुला, देवी असे पाठिसी !
जें होणार टळे न, काय म्हणुनी सोडुं प्रयत्ना कसें ?
दैवाच्याहि दयेस लागति जगीं यत्नादिचीं आमिषें !
मंदीराहुन पूज्य सुंदरपणें प्रासाद होई कसा ?
ये ये धांवत साजणीं बघ किती हा शुष्कला गे घसा !
झालेलें विसरूंच, विस्मृति असे, संजीवनी आजची
सौख्याच्या क्षणिं व्यर्थ मी न उकरीं ती आकृती कालची !

## वाऱ्यावरची इमारत

धिक् धिक् जीवन हें असह्य बनतां कान्ता पराची जगीं !
घेतों मारून मी स्वतःस मज दे सानंद पर्वानगी !
देशप्रेम तुझें बघून तुजला मी आपुली मानिली,
दावी तीच पराक्रमी अदयता जी आज आपेक्षिली !
गेलेला सुखसंगतींत अपुला हेमापरी काळ तो,
वृत्ती तन्मयता प्रकर्षुनि पुन्हा दृष्टीपुढें नाचतो !
तैं हातांत तुझा धरून विजनीं मी हात उद्गारलों—
"हा एकत्र निवास राहिल असा, मृत्यूवरी," हांसलों !
हांसे भेसूर काळरात, भवतीं माझ्या निराशा असे,
जातां भंगुन तार गाइल अतां संगीत वीणा कसें ?
अश्रूंचा शिडकाव हृद्य अनला दे ना मुळीं सौम्यता,
हा वाऱ्यावर बांधिला मि इमला ये घात ना सांगतां !

स्वच्छंदें सरिता खळाळुन पहा वेगामधें धांवते,
होतें केवळ तें अधःपतन ती क्षारांत सामावते !

## यौवनदर्प

आक्रंदून पुन्हा पुन्हा विनवितों ‘ येईं सखे मागुतीं, ’
दीक्षा प्रेमरसानभिज्ञ बनुनी कां घेतली संगती ?
कोताई उदयांतरीं न शुभगे, मोठी तुझी दानता,
शुक्लेन्दूपरि स्नेहवर्धन घडो, मैत्री न ये मागतां !
कीर्तीवन्त, सुबुद्ध मी असुनही त्वत्पादपद्मीं रत,
आहे मत्कुलगौरव प्रमुखसा, विद्वत्सभासंमत.
बैसे पाहत वाट जीव दुबळा कैचीमधें सांपडे,
कैदी केवळ मी तुझा तुजविना झालें जिणें बापुडें !
नक्षत्रें वर शोभती नच तुझ्या पायांवरी, मंगले,
गालांतील गुलाब, सांग नियतीं कोणीं कसें हुंगलें ?
पुष्पांचा उपयोग ना जन करी, निर्माल्य होती यदा,
माझ्या जीवनवाटिकेस अदये झालीस तूं तापदा !
कैशी यौवनदर्प दे तुज अशी बुद्धी पुरंध्रीपरी ?
त्यातें देउन चुंबनामृत मला कां अर्पिशी भाकरी ?

## इंद्रजाल

सोडी मुग्धपणा लकेर घुमवी संगीत दे सद्गती,
नाचे त्वद्रस माधुरी अभिनवा, श्रोते मनीं गुंगती !
अस्ताईंत तुझ्या विसावुन बसे मैनेपरी मार्दव,
ऐकोनी तव भैरवी विसरते आत्मैकता तें दंव !
सौंदर्यास तुझ्या ध्वनी मधुरता देई परीपूर्तता,
कां नादावुन पापमग्न बनशी पंकांतली तूं लता !
सारे सद्गुण एक दोष तुझिया ठायीं व्यभीचारिता,

जेथें फुल्ल गुलाब कंटक तिथें, उक्तीस ही सार्थता
द्यावें ठेवुन हस्तयुग्म हृदयीं, त्या स्वस्तिकाच्यापरी
तैशीं मादक चुंबनें फिरुनिया घ्यावीं तृषार्तापरी,
हे लीलावति, फेंक मोहक तुझी दृष्टी शरश्रेणि ती
हे हाटींतिल इंद्रजाल तव गे दावी चलाखी किती ?

त्वत्पृष्ठास्थित नागिणीपरि असे मी एक तूं गारुडी
मानेनें खुणवीत जा, तदुपरी हालेन घ्याया उडी !

## विजयी विश्व तिरंगी—

जिव्हाग्रीं रसवंति ये लगबगा प्रीति प्रभूपूजना,
रूपैश्वैर्यगुणाढय तूं लपविशी अभ्यंतरींच्या खुणा !
वाटे रव्युदयीं न अंबर अतां निस्तेजता लेइल,
राहु ग्रासून घे न घे अवचिता कां सांगतां येईल ?
आहे यौवन आयुरूप उदधीमध्यें हरिद् बुद्बुद,
हा आरोप दगा नसे, न नकली, वा कागदीं ताबुद !
ही दर्खास्त तुझ्यापुढें सुनविली, देई दिलासा मला,
रंभाउर्वशिना रणांत हरवी, त्या श्वेत, ही शामला !
बैसें मी अति खिन्न चित्त कलत्या सौधावरी बाजुला,
हें उंचावरती निशाण फडके राष्ट्रीय तें निस्तुला !
नाचे तें नटचंचळें पदरसें वाऱ्यावरी आगमी,
दावी खोलुनि बाजुबंद अपुल्या अंगांतलीं रुस्तुमी.

ज्या झेंड्यास्तव रंगलें भळभळां आझाद मैदान तें,
तें ' मैत्रेय ' असें अनाहुत तुझ्यामाझ्या विवाहामधें !

## शीलाची किंमत—

ओती चंद्रसुधा अखंडितपणें मेघांमधें बैसुनी,
यावज्जीव अशी उदार प्रचिति देतो प्रियेकारणीं !
तूं तो चंचळ दुष्कुळांतिल दिसे उच्चैश्रवाहूनही,
काडी लावुन भस्मसात करसी प्रेमाक्षरांची वही !
ओढाताण न सोसवे परि न मी प्रेमी अनासक्त हा,
प्रेमाची खुण रम्य, स्तंभ, दयिते, उंचावरी तो पहा !
भ्रूभंगांत तुझ्या असा दर असे, शक्ती नर:पुंगवी,
वाटे जो विपदोघ आज भयदा, पूर्वीं मला हांसवी !
बुट्टेदार, जरीत, रत्नमणिंनीं शेला तुझा शोभला,
जारानें तुझिया खुशीस्तव सणीं बीमोल तो अर्पिला !
त्या शेल्याहुन कोट माप पटिनें शीला तुझ्या किंमत,
दोरंगी दुनियेंत मज्बुत तुझी झाली असे फस्गगत !
पासंगासहि ना पुरेल धरणी ही थोर शीलापुढें.
कां सिंहासन कांपतें थरथरा नि:शस्त्र गांधींपुढें ?

## शठप्रति शाठ्यम् !

हां ! आतां वर हो अतिक्रम अतां ये शाहणी जागृती !
मी श्वानापरि ना च येइन अतां, वेडे, तुझ्या मागुतीं !
दोघांचाहि करीन खून अयशा जें जाहलें कारणीं,
आंता पद्मछदाक्ष खोलुन पहा, होणार जें जें रणीं !
मच्चारित्र्य सजेल नाटक तसें या उत्तरार्धामधें !
दैवी हत नायिकेपरि तुझा हो अन्त ज्वानीमधें,
वूनी पुढती कलेवर तुझें निष्पाप जें केवळ !
मी गाईन विलासगीत हृदयीं प्रीती असे निश्चळ,

देतां ही धमकावणी असुभयें त्यानें तुला सोडिलें !
भक्तीच्याविण देव धावत न ये रुद्राक्षहि ओढिले,
मारी ना शरणागतास, तुजला मी आपुली मानिली,
पश्चात्तापविदग्ध अश्रु दिसले मीं तीं फुलें चुंबिलीं !
बद्फैली अवलाद ये उगिच ही अंगावरी, रुस्तुमी
दावा मनूगटिची, करीन न तरी सापेक्ष धिःकार मी !

**दग्धबीज—**

" नाथा, मी व्यभिचारिणी, मजवरी ना दाखवा थोरवी,
ध्वांताला न करी क्षमा, अदय तो कां हो म्हणावा रवी ?
त्या रूपावर लोभुनी उमटलें पाऊल पंकामधें,
वर्षी ती कुमुदावली पण न ये माधुर्य पंका मधें."
देवी, आठव तो नको, गत निशा, तेजाळलें अंबरीं,
कीं झाला तह, शत्रु आज न मला होतीस तूं संगरीं !
पंचप्राण नळें सुखास्तव जिच्या ओंवाळुनी टाकिले,
त्या देवी दमयंतिलाहि विपिनीं त्याहींच ना टाकिलें ?
व्हाया त्वत्प्रगती, प्रमूदित मनें भावीन देहार्पण,
भक्तींतील अशीच भावघटना, व्यापारबुद्धीच न !
होतों मी विधुरापरी तळमळें भोगैकसंगाविना !—
एकीची जुळवून तार तरफी झंकारते ही विणा !
दे पेलाभर मद्य फक्त, परि दे ओंठांतलें आग्रहें,
स्वर्गंगा रमणीय राजिव दिसे देवी अनेक गृहें !

**' सद कलहाविना '—**

वाफाळून यदा घरा निघतसे चंडांशुच्या आतपी,
पर्जन्यास मिळेल किंमत, कुणी थंडीमधें ताक पी ?

येईना कलहाविना नविनता संसारिंच्या नाटकीं,
सत्तेचेच गुलाम, तो प्रभु असे, सर्वां नियंताच कीं!
तोही पालनहार दावि किमया गर्वाकुला मानवा,
किनूखापी बघ पेहरून कशिदा शालीपरी हा नवा!
प्रेमाची खुण मौल्यवान न लगे, मावे रुमालांत तें,
देई रेशिम जो किडा, जगतसे रानांतल्याही तुतें!
पुष्पांनीं सजवून मंचक पहा शृंगारला, भामिनी,
मिथ्या तीं विरहानलीं हृदयशीं जातील कोमेजुनी!
केसांची धनसंपदा रतिपरी लल्लाट शृंगारते,
मोत्यांचा शिरिं भांग, मेघ चपला किंवा दुभंगी मतें!
ये, ये, गे वनसुंदरी, हृदयिंची हारीं परेशानता,
जिंकी बुद्धिबळांमधें सखि मला प्यादीच ही तत्त्वता!

## कुमारसंभव—

घेती तुंगगिरीं नभावर बसे जी अप्सरा चुंबन,
भारद्वाज सखीस खूष करण्या गाई, घुमे हें वन.
या एकावर एक आदळुनिया लाटा रती दाविती,
देवी, हो रमलज्ञ, भाव मनिंचे जाणून घे संप्रती.
आणोनी रतिरंगणांत रुसवा, रंजीस आणूं नको,
ना कोणी परका मुशाफर अशी बुरुयांत येऊं नको!
येईं आंत, हुकूम सोड, करुं दे दासास या चाकरी,
या भेटींत कुमारसंभव घडो देवा विनंती करीं!
देईं सोडुन केश मुक्त, स्वकरें घालीन मी गुंफण,
गेली ही बघ गे कवेंत चिरुनि चोळी तुझी साजण!
हे भालावर घर्मबिंदु, फुलली रोमांचसेना कशी?
कामातूर तुझ्या मनांतिल खुणा शब्दें न उद्धारशी!

ओंठाआड जरी किती दडविला ‘ एकान्त ’ दोघांतला,
जातां ते नवमास जाहिर न का होईल तो भूतला !

## ‘ सुकांत चंद्रानना पातली ’—

दे अंकावर पारव्यापरि तुझी काया झुगारून ही,
स्त्री मिस्कील जुळे रसीवर तिला डोंबारिचें नृत्यही !
गप्पागोष्टिविनोद यांत सगळा हा काळ जाईलना ?
पत्रांतील न मज्कुरास बघशी, तूं वाचशी मायना !
ही संध्या, शशिसूर्य यांसह नटे, शोभा दिसे ती किती,
स्त्रीलिंगी मग तें जडाजड असो, शृंगार हा मानिती !
त्वद् इंदूवदनाकृती, स्मित तुझें, आकर्षितें तिर्यक,
नादावून किती मुशाफर तुझ्या रूपावरी आषक ?
पिंजारीं नभ कृष्ण हाय विरही सौदामिनी कामिनी,
किंवा ये गजगामिनी, घन करी, रोषामधें भामिनी !
ऐसा भास अभास राग शमवी शीतांशुलेखें परी,
गाढालिंगन देउनी अभिनवा शृंगार साजा करी !
या चंद्रासह रात्र मीं करमिली तो चंद्र हेवा करी,
देवी “ काढ कलंक हे धुवुनिया ” ऐशी विनंती करी !

## पुण्यास प्रयाण

त्या रात्रीं नटला पुन्हा प्रथमसा संसार माझा नवा,
भेटीचीच जिथें, तिथें परत हो मैत्री, अशी वानवा !
ग्रामत्याग करावयास्तव दिली सोडून मी नोकरी,
आलों पुण्यपुरीं, ‘ सुधारक ’ अशी कीर्ती त्रिखंडावरी !
गांवाहून बरेच लांब सजले रांगेमधें बंगले,
सेवानिवृत, भागले जन तिथें पत्त्यांमधें रंगले !

छोटासा टुमदार त्यांतिल असे पार्थीव राईमधें,
त्याचें नांव अशोककुंज अपुलें प्रस्थान मी तेथ दें.
हें कॉलेज, पुढें तळें तळपतें ऐन्यापरीं आतपीं,
जागा रम्य निवान्त, वाटत मना येथें बनावें तपी!
येथें 'भारत सेवकां 'सह दिसे, आधीपतीमंदिर,
पूर्वेलाच गणेशखिंड, जिचिया हातांमधें तख्‌दिर!

या खिंडींत पदांत लंगर पडे, कैदी बने माउली,
या खिंडींत पुन्हा कुणी शिलगवी, पिस्तूल बारावली?

## अनाथबालिकाश्रम.

जावें सूर्यकरें प्रयाण करितां अस्ताचलीं पर्वतीं,
सृष्टी मुग्धपणेंच्च गर्व हरिते, कोती नराची कृती!
कोणीं शर्विलकें सुवर्ण म्हणूनी मूर्ती अहा चोरिली,
कीं अस्पृश्यजना प्रवेश न मिळे तीं दैवतें लुसलीं?
विद्युद्दीप पहात दूरवरचे, गप्पा विनोदी मजा,
धांवे दूर मुळासुठा सित अशी सह्याद्रिजी आत्मजा!
हें झाडावरचें सिताफळ पहा, डोळे मयूरापरी,
तोडोनी सितपुष्प तूं चढविलें माझ्याच वक्षावरी!
ह्या पूर्वेस दिसे सकौतुकपणें पूजार्ह हा आश्रम,
होती पर्णकुटी विराट दिसते, आतां नको ते श्रम!
दुर्दैवी अबला जया दशदिशा ग्रासावया पाहती,
त्या येथें गृहितागमा बनुनिया विद्येस सन्मानती!

दाता आज बने विकल्प धरुनी चित्तीं विरोधास्पद,
देवा, दुःखनिवार वाद असला अंतीं न तोषास्पद!

## संमोह

एकान्तप्रिय आत्मचिंतन करी येथें मुमुक्षू मन,
अंतःशुद्धिविना चरित्र न बने, वा कीर्तिचें वर्धन!
थोरांचा सहवास आणि सुचना घ्याऊन होतां पुढें
होतें संकट लीन, दुःखहि ठरे धीरापुढें बापुडें!
झालों, दे वशिला मला करुनिया शाळेंतला शिक्षक,
होती ती सहशिक्षणास्तव तिथें बाला अती मोहक
नानारंगिं बघून रम्य वसनें होई मला आठव,
येथें इंद्रधनुष्य जप्त करुनी कीं आणिलें, संभव!
सौंदर्यें सगळ्या जरी विनटल्या, प्रत्येकिचें वेगळें,
वाटे इंद्रवनांतले विखुरले पुष्पादिकांचे मळे!
तारुण्यांत पदार्पणें करुनिया शृंगारती आननें,
केसांतील फुलें गुलाबगजरे गालामधें हांसणें!
विश्वामित्र चळे प्रतिप्रभु असा ती मेनका पाहतां,
मी राहीन सभिन्न कां अनुभवें येई असें सांगतां?

## नवीन मैत्री

जैं लाभे सहवास वाहुन पुरा गेला मनोनिग्रह,
माजे मस्त तुफान संशय सुटे कोठें न दीपग्रह!
मी तो सुंदर, कीं मुलायम असे पोषाख अन् वागणें,
अभ्यासास निमित्त मात्र न मिळे तो वेळ हीं कारणें!
सिंधू नांव सुरेख केस सुतरां भूमीप्रती चुंबिती,
होती ती प्रभु रम्य नाजुक जणूं पुष्पा मधूमालती!
देई रोज फुलें हळूंच अपुल्या वेणींतलीं काढुनी,
पत्रांतून मनोगतें कळविलीं अस्पष्ट जीं भाषणीं

" होकारांत तुझ्या भविष्य भरलें, येशील ना मागुती ?
मी बैसेन पहात वाट तुझिया प्रेमीं." असें सांगि ती!
भेटीचा महनीय योग जुळण्या एकांतभागीं तिनें,
जागा दूर अशी बिळें निवडली मोठ्या मिनत्वारिनें!
होती ती फुलली नवीनच जरी प्रीतीलता फुल्ल ती,
हुंगायास तिला किती लगबगा हीं पाउलें धांवती!

## चोरटी भेट!

भेटीचा महनीय योग जुळला हा योजिल्यासारखा,
तेव्हां प्रेमनिदर्शनास्तव करीं मीं घातली मुद्रिका!
ती कोणी परका मला समजुनी दूरावते तिर्यक,
लज्जेचा अतिरेक उत्कट युवां वांच्छेस हो घातक!
तैं गालावरतीं गुलाब फुलले मत्स्पर्श होतां क्षणीं,
चर्या जाय ढगाळुनी जल कसें ओथंबलें लोचनीं!
आकाशीं अरुणाश्व हा द्रुतगती टाकीत ये मोहरें,
येई जाग जगास, राउळि घुमे पूजारिचें 'ओम् हरे'!
भोंतालीं शुभगे दिशा उजळल्या ओढीं रवी प्रत्यजा,
वाऱ्याचा थरकांप आणि हिरिरी हा पोपटी गालिचा!
भेटीचें सुखरूप जाइ विरुनी शोकार्ह सायंतनीं,
कांते, तोंवर भोग दृग्सुखरुची वक्षावरी बिल्गुनी!
जो होणार असेल घात, उघड्या छातीवरी झेलुंया,
आतांचे क्षण मौल्यवान, शुभगे, कद्रूपरी खर्चुंया!

## गोपनस्फोट

गांवापासून दूर तो धबधबा, उद्यानिंचें वैभव,
त्या तेथेंच तिची मुलायम तनू ओलांडिते शैशव!

हो अज्ञातनिवास, भेट घडतां, प्रेमार्द संभाषणें;
ओंठांतील सुधेस सिंधु मजला अर्पी स्वतः आननें !
आला संशय हा हिरास, हळु मी तैं आवरीं मोह तो,
भ्रष्टाचार निषिद्ध साधु जगतां आवेशुनी सांगतो !
पत्रांतून तिला असें कळविलें, " सिंधू, न ये भेटतां;
मत्पत्नीस कळून येइ सगळी भेटींतली गुह्यता !"
आलें पत्र तिचें मला उलटुनी रोषामधें नागिण,
झालों वंचक मी तिच्या हृदयिं ये तप्तासुना आधण !
मी बोलूंच कसा, जिथें अनुसरे वृत्ती कसाई स्वतः,
पापी चित्त कधीं न जोर करितें, हा न्याय हो तत्त्वतः !
होतें पत्र मनोज्ञ तन्मय बनें मी हीनही वाचतां,
वाटे काव्य सुनीत भाव निथळे दृष्टी तिथें नाचतां !

## तिचें पत्र !

" कां नेलेस हिरावुनी प्रथमता मत्प्रेमरत्नास तूं ?
होती ही जर वंचना तुज करायाची अशी घातक !
प्रेमाची कमनीय वेल रुचिरा लागे फुलायास जों,
तूं आधार तिचा तिला उधळुनी होशी पुढें चालता.
" कां आरंभ असा मनोहर तुवां केलास या नाटकी ?
दुःखान्तीं जर तें कृतींतुन तुझ्या होणार होतें असें !
पत्रें तेविं फुलें तुला प्रियकरा मायेमुळें धाडिलीं,
तूं केलास स्विकार काय म्हणुनी तेव्हां तयांचा फुका ?
" 'माझें प्रेम असे तुझ्यावर,' असें बोलून जैं दाविलें,
कां स्वीकारुन मूकवृत्ति बसला इन्कार केल्याविना ?
अन् जेव्हां तरुणस्थितप्रगतिनें झालें उतावीळ मी,
दोघांच्या सहसंगमास तर तूं होशी विरोधास्पद ! "

मायेनें मन हो उदास असला मज्कूर हा वाचतां,
सत्याला अटकाव पूर्ण करुनी कब्जा न ये जिंकतां !

## सिंधुस्मृति

आवेगें धवल प्रवाह घुमवी गाणें गिरीगव्हरीं—
काळ्याभोर शिळांमधून तटिनी ही धांवते नाचरी !
ईर्षेनें पट दुग्धसिंधु सलिला जातां पुढें छेदुनी—
चित्ताच्या क्षितिजावरी उसळता उल्हास ये धांवुनी !
पाणी संथ तरी तरंग निकरीं कल्लोळुनी ये वरी,
चंद्राची रुचिरा छबी पसरली आहे प्रवाहावरी !
सिंधूच्यासह येत मी कितिकदां क्रीडासुखाकारणें,
देशाच्या गुणवर्णनांत रमलीं येथील संभाषणें !
" जो स्वातंत्र्यरवी हतप्रभ न हो रक्तार्घ्यदानासवें
हृत्पुष्यास समर्पुनी गुरुरवें गर्जुन जाई जवें !
ध्येयासक्त जरी प्रचंड गमली सौराष्ट्रचिंता धुरा,
मंडाल्यांतिल कोठडींत बसला तो शूर योद्धा खरा ! "
भक्तीनें हृदयामधें कितितरी तीं मातलीं वादळें,
होई आठव ' लोकमान्य ' म्हणतां, मन्नेत्र ओलावले.

## अंतिम वंदनें

किंवा मी " अनिवार दुःख असुनी जो जातसे धांउनी,
जो झुंजार झटे यशास्तव, करी क्रांती समुद्धारिणी !
ज्याची मान लवे न उन्नत कधीं येतां घडी दुर्धरा,
लाहोराकडचा प्रताप दुसरा तो शूर योद्धा खरा ! "
गांधींच्याच मतास सिंधु भजली होती पुण्याची जरी,
जाई वेळ निघून वाद करतां आकर्षि ती वैखरी !

निर्माता परि हाय निष्ठुर बने बेबंद मैत्रीसवें,
शोभा रम्य असो नसो थबकती डोळ्यांमधें आंसवें !
लोपे भेट परंतु मैत्रि न तशी माझी अशी भावना,
ऐशा या शरदप्रभातसमयीं सिंधुस्मृती हो मना !
पत्नी सोडुन मी तुझ्यास्तव कसें प्रेमामधें नांदणें ?
अश्रूंच्या सुमनांसवें करित मी अंतीम हीं वंदनें !

दोघांच्यामधलें परिस्थितिमुळें दूरावलें अंतर,
अद्यापी परि एकमेव अपुलें राहील अभ्यंतर !

## संसारसखी

सिंधूचा नवखा इथून तुटला संबंध तो सुप्रिय,
नांवें ठेवुं नका तिला घडतसे होतां मुलींचें वय !
जैशी सागरमंथनांतुन सुरें रत्नें हरित् काढिलीं,
माझ्या मानसमन्थनांतुन स्वतः ही उक्ति मीं काढिली !
शंकेच्या शिबिरांत चंचल अशी प्रीती रहावी कशी ?
लोपे संशय, ही सखी मज पहा संस्थापिते या कुशीं !
सिंधूचा विसरे हिच्या अभिनवा प्रेमामृतें आठव,
'पापाचारनिषिद्ध' साधुवचनें अभ्यंतरीं सांठव !
पूर्वी ती चुकली क्षमा करुनियां मीं भक्तिनें पूजिली,
आतां मी चुकतां दयान्वित बने संसारिची सावली !
कां त्या काञ्चनरत्नरंजित घरा सोडूनियां धांवलों,
कर्तव्यें यशदायि सोडुन सखी गेहाप्रती पावलों !

हीरेच्या विरहामुळें प्रकटली नेत्रांत भागीरथी,
माझ्या या अविवेकरूप रथिची आहेच ती सारथी !

## प्रियाप्रशस्ति !

नाहीं पंडित कीं प्रबंध लिहुनी राणी तुला अर्पिन,
नाहीं कीं कुणि शिल्पकार दयिते मूर्ती तुझी कोरिन !
नाहीं कीं कवि कीर्तिगान रचुनी शब्दान्वयें मंगल,
गावोनी रिझवीन कीं म्हणुनियां डोळ्यांमधें ये जल !
नाहीं कांहिं जरी तरी मनिं असे त्वद्भक्तिची भावना,
त्यासाठींच मनामधें करितसें मी नित्य आराधना !
कांहीं स्वार्थ धरून मी तुजकडे वाटेल आलों तुला,
नाहीं लोभ कधीं मनास शिवला तो काय ये आजला ?
प्रीती कां जडली तुझ्यावरि नसे माझी मला कल्पना,
अन् चित्तांत तशी न कारण कळे कां चालली घोषणा.
दृष्टींतील तुझ्या मनोहर पडे माझ्यावरीं मोहिनी,
आणी त्याचमुळें असा तुजकडे आलों सखे धांवुनी !
निःस्वार्थी किति मी हवेंच पण का सांगावयाला तुला ?
तें सांगेल भविष्य, तोंवरि नको पाहूं विकल्पें मला !

## आशावाद—

पुष्पप्रावृत पुष्करावरि तुझें सांनिध्य लाभावया,
आणी मंजुळ रम्य रागलहरी अद्भूत ऐकावया !
जन्माचें जरि पुण्य खर्चं पडलें, देईन ती किम्मत,
गाण्यानेंच मनांत येइल नवी, उत्थापनीं हिम्मत !
पूर्वींच्या अयशामुळें खचुनियां गेल्या उमेदी किती,
आशा मावळली न हिम्मत उरे होईल कीं दुर्गती !
अंधारांतुन ध्येयवाक्य कुणिसें उद्गारिलें गर्जुनी,
तें ऐकून नवा हताश हृदयीं ये धीर उल्हासुनी !

प्रेमाच्या भवती प्रचंड पडला आहे पसारा कसा !
त्याची साध्यअसाध्यता निरखितां ये कष्टता मानसा.
आशावाद महान तो मृगाजळा ऐसीच दे मोहिनी,
गुंते जीव उगीच सिंधु मजला भासेच ये मागुनी.
यत्नाच्याच बळें अतांवर तरी सिंधूस दूराविलें,
अन् अन्याज दयेमुळेंच सखिनें मातें पुन्हा मानिलें !

## रूढिप्रिय—

होते पुण्यपुरींतही कुणि असे इर्साल रूढिप्रिय,
स्पृश्यास्पृश्य-समेट त्यांस जहरी वाटे फुका अप्रिय !
ज्या एकीस्तव प्राणयज्ञ इकडे मानी महात्मा करी,
ती निर्मील कसा अनर्थ धरितां टीकास्त्र कोणावरी ?
आहे शील सलामतींत सगळा शुद्धीअशुद्धी खरी,
होवेनी ' अहिताग्नि, ' आग उधळूं पाहे कशी वैखरी !
देवें दस्तुरखुद्द काय लिहिलें " अस्पृश्य तो अप्रिय !"
हे देवापरि गांधि काय वदती, ऐका असे तो नय !
कां पत्नीवर बेगुमान करितां टीका खलाच्यापरी,
स्पृश्यास्पृश्य-विवाह मान्य मजला, आहें उभा संगरीं !
वेदोक्तीसह सिद्ध मी करुनियां देईन याची मता,
चाले हत्ति डुले झुले प्रमुदिता कुत्रीं तुम्ही भुंकतां !
ज्याला मानसमंदिरांत विभुसा सन्मानिति भारतीं,
ते गांधी न फुके, ध्रुवास न हरी, रानांत रंभा रती !

## दंभस्फोट—

समशेरीवर नाचुनी मिळवितों पैका, नशीबीं असे,
जें अर्धेंच मिळे तयांतिल सखी चत्कोरही खातसे !

मोतादींत सखी कशी कळतसे, ख्यालीखुशालींत ना ?
गोलंदाज तुम्ही अभेद्य तिचिया शीलास मानाल ना ?
हा उल्टा घट बुंदही न धरितो, झाला रिता सागर,
मी हा संभ्रमरूप दावित पहा, फोडोनिया डोंगर !
हा माडीवर ना चढे, घरिपरी फोनो म्हणे लावणी,
लागे त्या अफु रोज, यास्तव करी पर्सांपुढें लावणी !
जे अस्पृश्य तुम्हांस त्याज्य गमती, तीं का न हो माणसें ?
सन्मानून विधर्मियांस शठ हो, धिःकारिता यां कसें?
होतें कौरवसैन्य दीर्घ, लढला निःशस्त्रही मोहन,
भिंतीआड बसून आज जगतां जिंकीतसे मोहन !
मानी तद्वचनें अलोट दुनिया पुण्यस्मृतीच्या परी,
सावित्री सतिला न हारवि जगीं स्वर्गांतली ही परी !

## भ्रमनिरास

झालें कार्य न जें अनेक शतकें तो हा करी देव कीं ?
टीकाकार कलंदरापरि पळे शक्ती टिकेनाच की !
होतो त्रास न कां जगीं जननिला जैं ती कुळा वाढवी,
रूढी ही रविशी, हतप्रभ बने कालांतरानें रवी !
झाले दुष्मन दोस्त, ऐक्य सजलें, उद्धार हो भारतीं !
स्पृश्यास्पृश्य असा न भेद उरला ही साधुची सत्कृती !
होईना प्रभुदर्शनास्तव तया मज्जावहि मंदिरीं,
दोघांनीं सहभोजनास्तव जनां बोलाविलें हो घरीं!
जेवीं भारतखंड तेविं बदले, हर्षे पिताही मतें,
केली तार ‘ निघून ये सह तिच्या ’ वानी मनोधैर्य तें !
होतां भेट नकोच वर्णन तुम्ही संवेदनेनें पहा,
दुःख, प्रेम, सुखासहीत नटला माझा उपन्यास हा !

जाई दूर विमानयंत्र वरतीं घारीपरी वावरे,
येतां शीण पुन्हा परी परतुनी भूच्याच अंकीं ठरे !

## सिंहावलोकन—

येथोनी सरलें तिमिस्र हंसली रोषन् शरच्चंद्रिका,
अन् कंदील करून बारिक तुला मीं अर्पिली मुद्रिका !
गेलेले दिन, वाचतां उलटुनी पानें पुन्हा मागचीं,
दु:खाचीच दिसे, चिरी चरचरां काळीज जी मर्गजी !
गेला पाउस, ही पुन्हा पसरली रंगच्छटा आरुणी,
संपोनी वणवा, शुकासह पहा मैना रमे कूजनीं !
गेलें दैन्य, सखे, तुझ्यास्तवचि ही लाखावरी दौलत,
मी आधार अभिन्न, हास, लतिके, अंगावरी पेलत !
ना निर्दोष कुणीं जगांत, शशिही व्यंगामुळें शोभतो,
कांटेरीच गुलाब आज, रमणी, केसांवरी बैसतो !
त्या शंखासहि शंकरादि सुरसें पूजार्हना मानिति ?
गेलेले दिन, यांपुढील सुयशा नाविन्यता आणिती !
तें निर्दोष न पूर्व चित्र, पण तें वाटे पहावें तरी,
काळ चा कर त्यावरी फिरुनिया लोपेल तें नातरी ?

## सुखी शेवट—

राणीला मखरामधें बसविली, दे चंद्रिकेशा कला,
मी हा वारसदार, आज शिवण्या किंतू मनाई मला !
केव्हां होइल सांज आणि कधिं मी कब्जा तिचा घेइन,
उत्कंठा मनिं बेसुमार, रविला दे शाप संतापुन !
ही आरास करी नभास शशिची बेहोषली कामिनी,
माझा रंगमहाल नादवि पदन्यासामधें भामिनी !


या तब्कांत गुलाल, गर्द भरलीं जाईजुईचीं फुलें,
ये शय्येवर बैस गे, श्रुतिं कुडीं लोलंगतेनें डुले !
दों बुर्जांवर मन्मथाकृति बसे, मारी शरश्रेणि तो,
या मी रेशिम पातळांतुन तुझें तारुण्य पैछानतों !
दो हातांतील बिल्वरांतून निघे संचेतना दे रव,
त्वत्सौंदर्य महान् क्षणांत करशी स्वर्गापरी रौरव !

बोलायास बघे सखी, पण करीं तोंडास मी मोर्तब,
'होई आज सुखान्त शेवट' असा काढा तुम्ही मतलब !

समाप्त.

# ही जाहिरात वाचूं नका !

## मोदी यांचे पेढे कोणाला ठाऊक नाहींत ?



शुद्ध स्वदेशी साखरेपासून तयार केलेले सातारी पेढे, आंब्याची व खव्याची बर्फी व सर्व तऱ्हेची मेवामिठाई, त्याचप्रमाणें उत्तम साजुक तुपांतील चिवडा हे आमचे जिन्नस सर्व हिंदुस्थानांत नव्हे तर परदेशांतहि प्रसिद्ध आहेत. त्याची जाहिरातीनें प्रसिद्ध करण्याची जरूरी नाहीं.

माल व्ही. पी. नें बाहेरगांवीं उत्तम पॅकिंग करून पाठविला जातो.

पत्ता:—

**रा. दुर्गाप्रसाद चिनाप्पा मोदी.**

पुणें नं. २

एकनूर आदमी दसनूर कपडा

## दि पूना नॅशनल लॉन्ड्री

रेट कमालीचे स्वस्त व काम कमालीचें निर्मळ!

तुम्हांला आश्चर्य वाटेल कीं, हें कसें
परवडतें; पण आमचें धोरणच
असें आहे कीं, जास्त गिऱ्हा-
ईक, कमी फायदा. दोन
पैशांत व चारच दिव-
सांत कपडे धुवून
मिळतील.

पत्ता:—

लिमये महाराजांसमोर,
उंबऱ्या गणपतीजवळ,

प्रोपायटर—

श्री. लेले

॥ ॐ सत्यमेव जयते ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

श्रीव्यंकटेश प्रसन्न

# एकच भाव-माल तसा भाव

केसरी, ज्ञानप्रकाश, संग्राम, भाला यांचा सुका मेव्यास उत्तम-अभिप्राय मिळविलेले किराणा व सुकामेव्याचे व्यापारी

## दत्तात्रय नारायण हेजीब

बेडेकर यांच्या मसाल्याचे एजंटः—

रे मार्केटजवळ, शुक्रवार पेठ, घर नंबर २०, पुणें शहर

आमचे दुकानीं निवडक किराणा, सुकामेवा, सांगली, धारवाड येथील साजूक तूप, अस्सल केशर, काबुली हिंग, मिरची, हळद, मसाला (दळलेली पूड) सर्व तऱ्हेचा चहा, कॉफी, पेपरमिंट, मेणबत्ती, बिस्किटें, साबण, रॉकेल ड्रम व डबे, धारवाडी पोहे, शिकेकाई पूड बेडेकर मसाल्याचे सर्व तऱ्हांचे लहानमोठे डबे वगैरे खात्रीलायक माल ठोक व किरकोळ भावानें मिळेल.

अनुभव घेण्याची सविनय प्रार्थना आहे.

*Address—*
**D. N. Hejib,**
**Shopkeeper,**
*Shukrawar,* **No. 22**
**Poona City**

आपला कृपाभिलाषी,
द. ना. हेजीब

# दि गुजरात ग्लास वेअर ॲन्ड स्टोव्ह डेपो

आमचेकडे सर्व तऱ्हांचे लहानमोठे, भारीहलके स्टोव्ह विकत मिळतात. त्याप्रमाणें, हलक्या व भारी कपबशा, टेबल लॅंप्स्, हॅंगिग लॅंप्स्, वॉल लॅंप्स्, फ्लॉवर पॉटस्, ग्लोब, चिमण्या, इनॅमल वेअर व क्रॉकरी वेअर, कांचेच्या व चिनी मातीच्या बरण्या भाड्यानें व विकत मिळतात. पार्टी देणारांनीं याचा अवश्य फायदा घ्यावा. गिऱ्हाइकांचा अनुभव असा आहे कीं, आमचे कडील सामान अभंग असतें. एकवेळ अनुभव घेऊन पहा.

पत्ता:—

प्रोप्रायटर, शहा ब्रदर्स,
व्यंकटेशभुवन, पुणें नं. २



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८४०


---


एच्. एच्., हुसेन रझा यांचें अपटु-डेट

## —ए वन् रेस्टॉरंट—

### कॉलेज स्टुडंट्स्साठीं खुष खबर!

आतां शोकीन विद्यार्थ्यांना मांसाहारासाठीं कॅंपमध्यें जावयाचीं जरुरी नाहीं. आमच्या लक्ष्मीरोड व्यंकटेशभुवनमध्यें सर्व तऱ्हांच्या मांसाहाराची व शाकाहाराची सोय केलेली आहे.

जंटल्मेन लोकांसाठीं व फॅमिलीसाठीं आम्हीं दुसऱ्या मजल्यावर स्पेशल व्यवस्था केली आहे. आमच्याकडे सर्व तऱ्हांचीं चॉकलेट्स्, बिस्किटें, ड्रिंक्स्हीं ताजीं व हवाबंद असतात. एकदां स्वतः येऊन अनुभव घ्यावा.

पत्ता:—

एच्. एच्. हुसेन रझा,
लक्ष्मी रोड, पुणें नं. २

स्थलक्रमांक
म. ग्रं. सं. ठाणे.

मुद्रकः—सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एल्एल्. बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना,
९४७ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

प्रकाशकः—श्री. गोपाळ नरहर नातू, ३२५ y
सदाशिव पेठ, अशोकाव्हिला, पुणें.

REFBK-0004947
REFBK-0004947

Cover Printed at:—Deccan Printing Works, Poona 2